# रेल्वे प्रवाशांकडील ऐवज चोरणारे अटकेत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

रेल्वे प्रवाशांकडील पिशवीतून ऐवज चोरणाऱ्या चोरट्यांना लोहमार्ग पोलिसांच्या पथकाने अटक केली. चोरट्यांकडून सोन्याचे दागिने आणि लॅपटॉप, असा पाच लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रवींसिंग तेजपालसिंग लुभाणा (वय २७, रा. पूर विहार, त्रिलोकपुरी, नवी दिल्ली), शिवकुमार रामल्लाई (वय ५१, रा. मिल कॉलनी, रा. चुरापेल्ली, तमिळनाडू) अशी अटक करण्यात लेल्या चोरट्यांची नावे आहेत.

पुणे रेल्वे स्थानक ते कर्जत स्थानक परिसरात हला प्रवाशांकडील पिशवीतून दागिने चोरीला ण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. लोहमार्ग लिस दलाचे अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी ट्याला पकडण्याच्या सूचना तपास पथकाला



प्रवाशांकडील पिशवीतून ऐवज चोरणारा चोरटा. सोबत पोलिस पथक.

दिल्या होत्या. पोलिसांच्या पथकाने तपास करून लुभाणाला तुर्भे रेल्वे स्थानक परिसरात सापळा लावून पकडले. चौकशीत त्याने रेल्वे प्रवाशात लोणावळा, खंडाळा परिसरात रेल्वे प्रवासी महिलांच्या पिशवीतून दागिने चोरल्याची कबुली पोलिसांना दिली. लुभाणाकडून दोन लाख १७ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

पुणे रेल्वे स्थानक परिसरात रेल्वे प्रवाशांच्या पिशवीतून लॅपटॉप चोरीला गेले होते. तपास पथकाने सापळा लावून रेट्टामलाईला पकडले. त्याच्याकडून तीन लाख १३ हजार रुपयांचे चार लॅपटॉप जप्त करण्यात आले.

पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक इरफान शेख, सहायक निरीक्षक बाळासाहेब अंतरकर, सुहास माळवदकर, सुनील माने, अमरदीप साळुंके, संतोष जगताप, इम्तियाज आवटी, शिवाजी सावंत आदींनी ही कारवाई केली.

सामना

# रेल्वेत चोरी करणारे परप्रांतीय अटकेत

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) – रेल्वे प्रवास तसेच स्टेशनवर चोऱ्या करणाऱ्या परराज्यातील दोघांना पुणे लोहमार्ग पोलिसांच्या पथकाने अटक केली. आरोपींकडून ५ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

रवि सिंग तेजपाल सिंग लुभाना (वय-२७, मूळ रा. मयूर विहार फेज १, न्यू दिल्ली, सध्या सानपाडा रेल्वेस्थानक परिसर) आणि शिवकुमार रेटामल्लाई (वय -५१, रा. मिल कॉलनी, रामजीनगर, तिरुचेरापल्ली, तामीळनाडू) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. मागील काही दिवसांत पुणे लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत खंडाळा, जामरुख, पळसधरी येथे जबरी चोरीचे प्रमाण वाढले होते. यासाठी लोहमार्ग पुणेकडून गुन्हे शाखेच्या एका पथकाची नेमणूक करण्यात आली होती. या तपास पथकाने मागच्या दोन महिन्यांत झालेल्या जबरी चोरीचा अभ्यास करून तुर्भे रेल्वेस्थानकावरून रवि सिंग लुभाना याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक

**पुणे लोहमार्ग पोलिसांची कारवाई**

तपास केला असता, त्याने रेल्वेच्या खिडकीतून हात घालून लोणावळा, खंडाळा, जामरुख रेल्वेस्थानक येथे रेल्वेतील महिला प्रवाशांच्या बॅग, गळ्यातील मंगळसूत्र चोरले असल्याचे कबुल केले. त्याच्याकडून नवी मुंबई येथून सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. तर, पुणे रेल्वेस्थानक येथून रात्रीच्या वेळी लॅपटॉप चोरणाऱ्या शिवकुमार रेटामल्लाई याला सापळा रचून अटक केली. त्याने चोरलेले ४ महागडे लॅपटॉप तिरुचेरापल्ली, तामीळनाडूतून जप्त केले आहेत. दोन्ही आरोपींकडून ५ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लोहमार्ग पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक इरफान शेख, सहायक निरीक्षक बाळासाहेब अंतरकर, सहायक फौजदार सुहास माळवदकर, सुनील माने, हवालदार अमरदीप साळुंखे, संतोष जगताप, इम्तियाज अवटी, शिवाजी सावंत, रुपेश पवार, सचिन राठोड यांच्यासह पथकाने ही कामगिरी केली.